**दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई**

(दि विदर्भ **को– ऑप.बँक** लि., सम्मिलीत )

(शेडयुल्ड बँक)

सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग ९, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स लेन,

फोर्ट, मुंबई ४०० ००१, पोस्ट बॉक्स नं.४७२

फोन नं. ९१-०२२–२२८२२२१७/२२८७६०१५ ते २०, Web Site: www.mscbank.com

---

## चल व अचल मालमत्ता विक्रीसाठी / भाडयाने देण्याबाबतची निविदा सुचना

दि महाराष्ट्र स्टेट को–ऑप.बँक लिमिटेड मुंबई **"सेक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शिअल असेटस ॲन्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (सरफेसी) ॲक्ट २००२"** नुसार कर्जदार संस्थांच्या खालील नमुद मालमत्तेची विक्री करण्यासाठी / भाडयाने देण्यासाठी मोहोरबंद निविदा मागवित आहेत.

कर्जदार व मालमत्तेचा तपशिल खालील प्रमाणे :– (रु.लाखात)

| अ क्र | संस्थेचे नांव | क्षमता | मालमत्ता तपशील | राखीव किंमत (रु. लाखात) | बयाना रक्कम (रु. लाखात) १० % | भाडयाची अनामत सुरक्षा रक्कम | ३०.०९.१७ रोजी येणेबाकी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | जयकिसान ससाका लि., बीदेगांव,, ता.दारव्हा, जि.यवतमाळ | २५०० मे.टन प्रति दिन | जमीन ६६ हे.४३ आर. व इमारत, स्ट्रक्चर | १८७०.०० | १८७.०० | ३५.०० | २११४०.९१ |
| | | | प्लॅन्ट व मशिनरी | १२५९.०० | १२५.९० | | |
| | | | एकूण | ३१२९.०० | ३१२.९० | | |
| २ | देवगिरी ससाका लि., जि–औरंगाबाद | २५०० मे.टन प्रति दिन | कारखाना इमारत/ जमीन ८३.०१हे.आर | ३०८५.०१ | ३०८.५० | ४५.०० | ३४१०.५८ |
| | | | प्लॅन्ट व मशिनरी | ११७०.०० | ११७.०० | | |
| | | | एकूण | ४२५५.०१ | ४२५.५० | | |
| ३ | कडा ससाका लि., जि–बीड | १२५० मे.टन प्रति दिन | कारखाना इमारत व जमीन ७१.५८ हे | २६२६.४० | २६२.६३ | ५०.०० | ३२५९.६३ |
| | | | प्लॅन्ट व मशिनरी | २०२४.४० | २०३.४५ | | |
| | | | एकूण | ४६५०.८० | ४६६.०८ | | |
| ४ | गजानन ससाका लि., सोनाजीनगर, जि–बीड | १२५० मे.टन प्रति दिन | कारखाना इमारत व जमीन १८५ एकर | १८५३.९९ | १८५.४० | २०.०० | ६८५२.६२ |
| | | | प्लॅन्ट व मशिनरी | १३२.१० | १३.२० | | |
| | | | एकूण | १९८६.०९ | १९८.६० | | |
| ५ | प.डॉ. वि. वि. पाटील ससाका लि., जि–बीड | २५०० मे.टन प्रति दिन | कारखाना इमारत/ प्लॅन्ट व मशिनरी जमीन (६८.७६ हे.) | --- | --- | ५०.०० | राज्य बँक ९१८७.२९ सहभाग ८६०७.३६ (३१.१२.१६) |

| अ क्र | संस्थेचे नांव | क्षमता | मालमत्ता तपशील | राखीव किंमत (रु. लाखात) | बयाना रक्कम (रु. लाखात) १० % | भाडयाची अनामत सुरक्षा रक्कम | ३०.०९.१७ रोजी येणेबाकी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| ६ | डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर ससाका. लि., अंबुलगा, ता.निलंगा, जि.लातूर | २५०० मे.ट. प्रती दिन | कारखाना इमारत/ प्लॅन्ट व मशिनरी व जमीन ९२.८५ हे. | | | ४०.०० | राज्य बँक १९१२३.७९ सहभाग ५९२.७९ (३१.१२.१६) |
| ७ | स.म.स्व.बापूरावजी देशमुख ससाका.लि., वेळा ता–हिंगणघाट, जि.वर्धा | २५०० मे.ट. प्रती.दिन | प्लॅन्ट मशिनरी/ फॅक्टरी शेड, जमीन / इमारत व स्ट्रक्चर स्क्रॅप व भंगार व स्टोअर मटेरीअल | ---- | --- | ४०.०० | राज्य बँक १२१०५.२६ सहभाग ३३०५.३२ (३१.०३.१७) |
| ८ | शेतकरी ससाका लि., किल्लारी, ता–औसा, जि–लातूर | १२५० मे.टन **प्रति दिन** | इमारत, प्लॅन्ट व मशिनरी व जमीन १६२.७४ एकर | ---- | ---- | ३२.०० | १४१७.३१ |
| ९ | जय जवान जय किसान ससाका लि.,नळेगांव, ता–चाकूर, जि–लातूर | १२५० मे.टन **प्रति दिन** | कारखाना इमारत, प्लॅन्ट व मशिनरी जमीन २९१.६७ एकर | ---- | ---- | २५.०० | ६६६८.०९ |
| १० | अकोट तालुका सह.सूत गिरणी लि., जोगबन , ता.अकोट, जि. अकोला | **१७२८०** स्पिंडल्स | गिरणी इमारत व जमीन २५ हे. १९ आर. | १२३९.०० | १२३.९० | १५.०० | १०३५२.१९ |
| | | | प्लॅन्ट व मशिनरी | १७५.०० | १७.५० | | |
| | | | एकूण | १४१४.०० | १४१.४० | | |
| ११ | रीकडेश्वर सह.सूत गिरणी लि., खांदेगांव, ता–बसमत, जि–हिंगोली | कार्यान्वित उत्पादन क्षमता २११६८ स्पिंडल्स | इमारत, निवासी वसाहत, प्लॅन्ट आणि मशिनरी व जमीन (११.६७ हे.आर) | --- | --- | २७.०० | ३५७९.२० |
| १२ | वसंत शेतकरी सह.सूत व कापड गिरणी लि., डोंगरगांव, ता–केळापूर, जि–यवतमाळ | १२००० स्पिंडल्स | बिल्डींग ॲण्ड स्ट्रक्चर प्लॅन्ट ॲण्ड मशिनरी | --- | --- | १.०० | ११४.०५ |
| १३ | तालुका शेतकरी दालमिल प्रक्रिया सह.संस्था मर्या, उदगीर,जि.लातूर | १ टन प्रति तास | इमारत, प्लॅन्ट व मशिनरी आणि जमीन (६९४० चौ. मी. ) | ––– | ––– | १.०० | ४०९.२७ |

या सर्व संस्थांच्या भाडे / विक्रीच्या नोटीस यापूर्वी बँकेने सेक्युरिटायझेशन कायद्याच्या नियम ८(६) अंतर्गत दिल्या असल्याने सदरची जाहिरात १५ दिवसांची देण्यात येत आहे.

**अ) <u>विक्रीसाठी अटी खालील प्रमाणे –</u>**

१. उपरोक्त मालमत्ता 'जशी आहे आणि जिथे आहे, ज्या स्थितीत व जे आहे' अशा अटीवर व ज्यास कोणतीही हमी, खात्री, बंधन, जबाबदारी वा प्रतिनिधीत्व शिवाय असलेल्या तत्वावर विकण्यात येईल. चल – अचल मालमत्तेचे क्षेत्रफळ, संख्या इ. बाबत कोणतीही हमी, खात्री, जबाबदारी इ.बाबत प्राधिकृत अधिकारी जबाबदार असणार नाहीत. प्रा.फंड, शासकीय देणी, विज बिल, पाणी बिल, कामगार देणी, इ.वा अन्य वैधानिक देणी (सद्याची व भविष्यात निर्माण होणारी) सर्वदेणी भागविण्याची जबाबदारी खरेदीदाराची राहील. या व्यतिरिक्त ७/१२ उता-यावर नोदंविलेले बोजे भागविण्याची जबाबदारीही खरेदीदाराची राहील.

२. निविदा राखीव किंमतीपेक्षा जादा असणे आवश्यक आहे. निविदेत नमूद रक्कम अंतिम समजली जाईल. परंतू निगोशिएशन होणार नाहीत. निविदा भरताना ही बाब लक्षात घेणे जरुरी आहे. टेंडर उघडण्याच्या दिवशी प्राधिकृत अधिकारी सर्वोच्च निविदा भरणा-या निविदाधारकास ई–टेंडरींगसह यशस्वी घोषित करतील. यशस्वी निविदाधारकास मालमत्ता स्वतःच्या नांवावर करुन घेण्यासाठी लागणारा खर्च उदा. मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क इ. करावा लागेल.

३. निविदा सोबत १० % बयाणा रक्कमेचा भरणा आर. टी. जी. एस. द्वारे (RTGS/NEFT:IFSC:MSCI 0082002 A/c No.116459 MSCB Agro Dept ) दि महाराष्ट्र स्टेट को.ऑप.बँक लि., मुंबई येथे निविदा सुपूर्द करणेपुर्वी जमा करणे आवश्यक आहे. अयशस्वी निविदाधारकांना बयाणा रक्कम त्या दिवशी किंवा पुढील दिवशी परत करणेत येईल. बयाणा रक्कमेवर व्याज देण्यात येणार नाही.

४. निविदा पुस्तिका (बीड डाक्युमेंट) बँकेचे मुख्य कचेरी, मुंबई व प्राधिकृत अधिकारी, यांचेकडे अनु.क्र.१ साठी दि.१४.११.२०१७ ते दि.०७.१२.२०१७ व अनु.क्र. २ ते १३ साठी दिनांक १४.११.२०१७ ते २३.११.२०१७ या दरम्यान कार्यालयीन दिवशी (दुसरा व चौथा शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टी व्यतिरिक्त) सकाळी ११.०० ते सायं. ५.०० या वेळेत मिळतील. त्याकरीता निविदा सादर करण्यापूर्वी बिना परताव्याचे रु.२५,०००/– (रु.पंचवीस हजार फक्त) प्रमाणे रोख रक्कम/एन.ई.एफ.टी.द्वारे भरणे किंवा तेवढ्या रक्कमेचा बँकेचा डी.डी.निविदेसोबत सादर करणे आवश्यक राहील. निविदा पुस्तिका मुख्य कचेरी, मुंबई व टेंडर डॉक्युमेंटमध्ये नमूद प्रादेशिक कार्यालये येथे मिळतील.

तसेच निविदा पुस्तिका (बीड डॉक्युमेंट) बँकेच्या बेबसाईटवरुनही (www.mscbank.com ) डाऊनलोड करुन भरता येतील. त्यांनी १२५,०००/– चा भरणा निविदा उघडण्याचे दिवशी करावा लागेल.

५. निविदाधारक कारखान्याची संपूर्ण मालमत्ता किंवा प्लॅन्ट व मशिनरीसाठी वेगवेगळया निविदा भरु शकतात. प्रत्येक लॉटसाठी स्वतंत्र बयाणा रक्कम भरणा करावयाची आहे. बयाणा रक्कमेचा भरणा निविदेत नमूद खात्यावर आर.टी.जी.एस. व्दारे करावयाचा आहे.

६. निविदा दाखल करावयाची अंतिम तारीख अनु. क्र. १ साठी दि.०८.१२.२०१७ व अनु. क्र.२ ते १३ साठी दि.२३.११.२०१७ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत राहील. निविदा मुख्य कचेरी, मुंबई येथे दाखल कराव्यात.

७. विक्री संबंधित प्राप्त निविदा उघडण्याची तारीख २४.११.२०१७ (मालमत्ता क्र.२ ते १३ साठी) व ११.१२.२०१७ (मालमत्ता क्र.१ साठी) राहील.

८. प्राप्त निविदांपैकी कोणती निविदा भाडेतत्वावर/विक्रीसाठी स्विकारण्याचा अधिकार बँकेस राहील.

९. कोणतेही कारण न देता निविदा स्विकारण्याचा/ रद्दबातल ठरविण्याचे अधिकार प्राधिकृत अधिकारी यांना राहिल. प्राधिकृत अधिकारी हे सिक्युरिटायझेशन ॲक्ट मध्ये नमुद केलेल्या नियमानुसार तारण मालमत्तेची विक्री करु शकतील किंवा भाडेतत्वावर देऊ शकतात.

१०. प्रत्येक संस्थेच्या विक्री मालमत्तेच्या निविदा पुस्तिका (बीड डॉक्युमेंट) बँकेच्या www.mscbank.com वेबसाईटवरही दि.१४.११.२०१७ पासून उपलब्ध राहील. (यातील अटी/शर्ती विक्रीस लागू राहतील.)

११. उपरोक्त माहितीतील मुद्दे, अटी, शर्तीच्या स्पष्टतेसाठी बँकेच्या www.mscbank.com बेबसाईटवर बँकेने दि.०९.११.२०१७ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीतील माहितीचा आधार घ्यावा व तो अंतिम राहील.

**ब) <u>भाडेतत्वावर चालविणेसाठी देणेच्या अटी खालील प्रमाणे</u>**

१२. निविदा पुस्तिका (बीड डाक्युमेंट) प्राधिकृत अधिकारी यांचेकडे दिनांक १४.११.२०१७ ते दि.२३.११.२०१७ या दरम्यान कार्यालयीन दिवशी (दुसरा व चौथा शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टी व्यतिरिक्त) सकाळी ११.०० ते सायं. ५.०० आणि त्याकरिता निविदा सादर करण्यापूर्वी बिना परताव्याचे रु.५,०००/- (रु.पाच हजार फक्त) रोख रक्कम/आर.टी.जी.एस.द्वारे भरणे किंवा तेवढ्या रक्कमेचा बँकेचा डी.डी.निविदेसोबत सादर करणे आवश्यक राहील. निविदा पुस्तिका मुख्य कचेरी, मुंबई व संबंधित प्रादेशिक कार्यालये येथे मिळतील. तसेच निविदा पुस्तिका (बीड डॉक्युमेंट) बँकेच्या वेबसाईटवरुनही (www.mscbank.com ) डाऊनलोड करुन भरता येतील. मालमत्ता पाहण्याची दि.१८.११.२०१७ रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत राहील. प्राप्त निविदा उघडण्याची तारीख २४.११.२०१७ (मालमत्ता क्र.२ ते १३ साठी) व ११.१२.२०१७ (मालमत्ता क्र.१ साठी) राहील. कोणतेही कारण न देता निविदा स्विकारण्याचा/सर्व निविदा रद्दबातल ठरविण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकारी यांना राहिल.

टिप :- सर्व इच्छुक भाडेधारकांनी राज्य बँकेचे येणेबाकी, कारखान्याची सर्व देयता, (डयु डिलिजन्स स्वतः करुन घेवून) व कारखाना कार्यान्वयीत करण्यासाठी येणारा खर्च विचारात घेवून (एकूण कर्ज येणेबाकी परतफेडीच्या नियोजन कालावधीसह) भाडे प्रस्ताव सादर करावे.

टेंडर फॉर्म विक्री दि.१४.११.२०१७ ते २३.११.२०१७ पर्यंत (मालमत्ता क्र.२ ते १३ साठी) व दि.१४.११.२०१७ ते ०७.१२.२०१७ (मालमत्ता क्र.१ साठी) बँकेच्या http:/www.mscbank.com या संकेत स्थळावर उपलब्ध राहातील. उपरोक्त सर्व कारखान्यांची मालमत्तेची विक्री ई-ऑक्शन द्वारे करण्यात येत असून संबंधी बीड डॉक्युमेंट, ऑन लाईन बीड फॉर्म, डिक्लेरेशन व अटी व शर्ती http:/www.bankauctions.in या वेबसाईट वर दि.१४.११.२०१७ पासून दि.२३.११.२०१७ पर्यंत (मालमत्ता क्र.२ ते १३ साठी) व दि.१४.११.२०१७ ते ०७.१२.२०१७ (मालमत्ता क्र.१ साठी) उपलब्ध असतील.

## वैधानिक नोटीस

कर्जदार/जामिनदार यांना सुचित करण्यात येते की, एकुण कर्ज येणेबाकीचा भरणा निविदा उघडणेपूर्वी करावा. अन्यथा जप्त मालमत्तेची विक्री करुन कर्ज वसुली केली जाईल. तसेच विक्री प्राप्त रकमेतून संपूर्ण वसुली न झाल्यास उर्वरित कर्जबाकी व्याज व इतर खर्चासह आपणांकडून वसुली केली जाईल याची नोंद घ्यावी. अ.क्र. २ ते १३ बाबतीत नोटीस पुर्वीच्या विक्री जाहिराती वेळी देण्यात आलेली आहे. त्यामुळे ३० दिवसाची वैधानिक तरतुदीची पुर्तता झालेली आहे.

सही/-
( डॉ. अजित देशमुख )
प्रभारी व्यवस्थापकीय संचालक तथा प्राधिकृत अधिकारी
दि महाराष्ट्र स्टेट को.ऑप.बँक लि., मुंबई

दिनांक :- ०९.११.२०१७
ठिकाण :- मुंबई